माहितीचा
अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, मुख्यालय

१३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.
website : sic.maharashtra.gov.in

दूरध्वनी क्र. ०२२-२२०४९१८४ फॅक्स क्र.०२२-२२०४९१३९

क्र. मुमाआ-२०२३/प्र.क्र. ७३ /०२ दिनांक: २०.१०.२०२३.

## कार्यालयीन आदेश

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १५ (४) अन्वये, राज्य माहिती आयोगाच्या कामकाजाचे सर्वसाधारण अधीक्षण, संचालन व व्यवस्थापन हे राज्य मुख्य माहिती आयोगाकडे निहित असेल व त्याला राज्य माहिती आयुक्त सहाय्य करतील आणि राज्य माहिती आयोगाला, या अधिनियमाखाली कोणत्याही इतर प्राधिकरणाच्या निदेशांना अधीन न राहता, स्वायत्तपणे वापरता येत असतील असे सर्व अधिकार वापरता येतील आणि करता येत असतील अशा सर्व कृती व गोष्टी करता येतील.

राज्य माहिती आयोगाच्या दिनांक ०६/१०/२०२३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये मुख्य माहिती आयोग व इतर सर्व खंडपीठांमधील सुनावणी व कामकाजामध्ये एकसुत्रता आणण्यासाठी खालील प्रकारच्या प्रकरणांमध्ये सुनावणीसाठी दोन किंवा जास्त सदस्यांचे संयुक्त खंडपीठ गठीत करण्यास (Constitution of Bench) मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १५ (४) अन्वये खालील प्रकारच्या प्रकरणांमध्ये सुनावणीसाठी खंडपीठ स्थापन करण्याबाबत (Constitution of Bench) आदेश पारित करण्यात येत आहेत.:-

१. ज्या प्रकरणांमध्ये सर्व खंडपीठांच्या आदेशामध्ये एकसमानता आणण्याची आवश्यकता आहे अशी प्रकरणे.
२. ज्या प्रकरणांमध्ये महत्वाची व माहिती अधिकार कायद्यातील तरतुदींचा अन्य प्रचलित कायद्याच्या अनुषंगाने अर्थान्वय (Legal Interpretation) लावण्याची बाब अंतर्भूत असेल अशी प्रकरणे.
३. राज्य माहिती आयुक्तांना आवश्यक वाटतील अशी इतर कोणतीही प्रकरणे.

वरील प्रकारच्या अपीलांची प्रकरणे संबंधित खंडपीठांकडून मुख्य माहिती आयोगास पाठविण्यात येतील. तद्नंतर सदर प्रकरणांची छाननी करण्यात येऊन अशी प्रकरणे खंडपीठ (Bench) गठीत करण्यासंदर्भात मा. मुख्य माहिती आयुक्तांसमोर सादर करण्यात येतील. मा. मुख्य माहिती आयुक्तांतर्फे सदर प्रकरणांमध्ये खंडपीठ (Bench) गठीत करण्यात यावा किंवा कसे, खंडपीठ (Bench) गठीत करावयाचा असल्यास त्यामधील सदस्य याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

२. सदर कार्यालयीन आदेश मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

(सविता जावळे)
सचिव,
राज्य मुख्य माहिती आयोग, मुंबई

प्रत: १) उप सचिव, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई, कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर खंडपीठ.
२) उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्या-६), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३) संग्रहार्थ.